

भुयारी मेट्रो-३ लवकरच सेवेत

मुंबई जर्नल

# भुयारी मेट्रो-३ लवकरच सेवेत

## ■ पहिल्या टप्प्याचे काम ८७ टक्के पूर्ण
## ■ मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंकडून आढावा

गिरीश चित्रे/मुंबई

**मुंबईतील वाहतूककोंडी फोडण्यासाठी मेट्रो रेल महत्त्वपूर्ण ठरणार असून, भारतातील सर्वात लांबीची भुयारी मेट्रो ३ प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याचे ८७.२ टक्के काम पूर्ण झाले आहे. भुयारी मेट्रो ३ रेल्वेने २०३१ मध्ये दररोज १७ लाख प्रवासी प्रवास करतील, असे नियोजन केले आहे. तर एका गाडीची अडीच हजार प्रवासी क्षमता असूनही तीन गाड्या दाखल झाल्या आहेत. तर दोन गाड्या पुढील आठ ते दहा दिवसांत मुंबईत दाखल होतील. तसेच बीकेसी ते आरे कॉलनी पहिला टप्पा डिसेंबर २०२३ पर्यंत प्रवासी सेवेत दाखल होईल. मुंबई मेट्रो रेल ही मुंबईची जीवनरेषा आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.**

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनमार्फत सुरू असलेल्या मुंबई मेट्रो लाईन ३ या भूमिगत प्रकल्पाचा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी रात्री उशिरा आढावा घेतला. यावेळी त्यांच्यासोबत प्रधान सचिव ब्रिजेश सिंह, मुंबई मेट्रो रेलचे संचालक सुबोध गुप्ता आणि इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. कफ परेड ते सीप्झ दरम्यान प्रस्तावित असलेल्या या मेट्रो मार्गाचे सद्यस्थितीत काम प्रगतिपथावर आहे. मेट्रो ३ सारखा तांत्रिकदृष्ट्या कठीण प्रकल्प पूर्ण करण्याचे आव्हान कॉर्पोरेशनचे अधिकारी लीलया पेलत असल्याचे म्हणत शिंदे यांनी एमएमआरसीएलच्या अधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. दरम्यान, मुंबई मेट्रो रेलच्या व्यवस्थापकीय संचालिका अश्विनी भिडे यांच्या नेतृत्वाखाली मेट्रो रेल प्रकल्पाचे काम सुरू आहे.

बीकेसी ते आरे कॉलनी पहिला टप्पा डिसेंबर २०२३ पर्यंत प्रवासी सेवेत आणण्याचे नियोजन आहे. तसेच आतापर्यंत ८७.२ टक्के काम पूर्ण झाले, असे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालिका अश्विनी भिडे यांनी दैनिक 'नवशक्ति'शी बोलताना सांगितले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी रात्री मेट्रो ३ प्रकल्प कामाचा आढावा घेत विधान भवन व चर्चगेट स्थानकाची पाहणी केली. मुंबई मेट्रो मार्ग-३ (कुलाबा-वांद्रे-सिप्झ) हा पहिला आणि एकमेव पूर्णपणे भूमिगत मेट्रो मार्ग आहे. शहरात वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी तसेच वाहतुकीच्या पर्यायी सुविधेसाठी मेट्रो-३ मार्ग महत्त्वपूर्ण ठरणार आहे. २०३१मध्ये दररोज १७ लाख प्रवासी मेट्रो-३ मार्गावर प्रवास करतील. प्रत्येक मेट्रो गाडीत २५०० प्रवाशांना प्रवास करता येईल. प्रत्येक गाडी ही ३ ते ४ मिनिटांनी उपलब्ध असली तरीही सदर मेट्रो गाड्या दर २ मिनिटांच्या कालावधीत धावतील, असा विश्वास व्यक्त केला. डिसेंबर २०२३ पर्यंत आरे ते बीकेसी दरम्यान (फेस १) मेट्रो मार्गिका ३ सुरू करण्याचे नियोजित असल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आढावादरम्यान महत्त्वाच्या सूचना केल्या. तसेच सुरू असलेल्या कामांबाबत समाधान व्यक्त केले. विधान भवन स्थानकाचे ८८, तर चर्चगेट स्थानकाचे ८३ टक्के काम पूर्ण झाले आहे.

मेट्रो ३ कार्यान्वित झाल्यावर ही दोन्ही स्थानके चाकरमान्यांसाठी वरदान ठरणार आहेत. मेट्रो ३ मार्ग हा मेट्रो -१, २,६ आणि ९ यांना तसेच मोनोरेलला जोडला जाणार आहे. याशिवाय, उपनगरी रेल्वे मार्गाला चर्चगेट आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे त्याशिवाय मुंबईतील विमानतळांनाही हा मार्ग जोडला जाणार आहे.





### २६ भुयारी स्थानके

- कुलाबा-वांद्रे-सिप्झ हा ३३.५ किलोमीटर लांबीचा भुयारी मार्ग आहे
- या मार्गावर २७ स्थानके असून, त्यापैकी २६ भुयारी, तर एक जमिनीवर आहे.
- या मार्गामुळे प्रमुख व्यवसाय आणि रोजगार केंद्रे, रुग्णालये, शैक्षणिक संस्था, धार्मिक स्थळे, मनोरंजनाच्या सुविधा तसेच उपनगरीय रेल्वेशी न जोडलेल्या काळबादेवी, गिरगाव, वरळी, आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत विमानतळांसारख्या भागांना जोडणी मिळेल.
- २०२४ पर्यंत मेट्रो-३ च्या प्रत्येकी ८ डब्यांच्या ३१ गाड्या कार्यरत असतील.
- इतर मेट्रो मार्ग, मोनोरेल, उपनगरीय रेल्वे आणि एसटी बस सेवांशी एकत्रित जोडणी करत असून, उपनगरीय रेल्वेतील १५ टक्के प्रवासी मेट्रो-३ कडे वळतील.
- वर्ष २०४१ पर्यंत मेट्रो-३ मुळे वाहनांच्या फेऱ्यांमध्ये प्रतिदिन ६.६५ लाखांनी घट होईल.
- या मार्गामुळे दरवर्षी २.६१ लाख टन कार्बनडाय ऑक्साईड उत्सर्जन कमी होईल.



### आंध्र प्रदेशातून ४ गाड्या ताफ्यात दाखल होणार

आतापर्यंत मेट्रो-३ च्या तीन गाड्या मुंबईत दाखल झाल्या आहेत व अजून दोन गाड्या श्रीसीटी आंध्र प्रदेश येथील ऑस्तोम कारखान्यातून मुंबईकरिता रवाना झाल्या असून, १७/१८ मेपर्यंत सदर गाड्या मुंबईत दाखल होणे अपेक्षित आहे. यानंतर उर्वरित ४ गाड्या प्रत्येक महिन्यात २ अशा मुंबईत दाखल होतील.

### पहिला टप्पा : आरे ते बीकेसी

- या मार्गावर १० स्थानके असतील.
- अंतर - १२.४४ किमी
- दोन गाड्यांमधील कालावधी - ६.५ मिनिटे
- पहिल्या टप्प्यातील गाड्यांची संख्या - ९ गाड्या
- पहिल्या टप्प्यातील एकूण ८७.२ टक्के काम पूर्ण

### इतके काम पूर्ण

- एकूण ९७.८ टक्के प्रकल्प बांधकाम पूर्ण
- एकूण ९३ टक्के स्थानक बांधकाम पूर्ण
- एकूण ६५.१ टक्के प्रणालीची कामे पूर्ण
- रेल्वे रुळाचे एकूण ८६.३ टक्के बांधकाम पूर्ण
- सेवेची चाचणी ऑक्टोबर २०२३ पर्यंत सुरू होणे अपेक्षित

### दुसरा टप्पा - बीकेसी ते कफ परेड

- एकूण स्थानके - १७
- अंतर - २१.३५ किमी
- दोन गाड्यांमधील कालावधी - ३.२ मिनिटे
- दुसऱ्या टप्प्यातील गाड्यांची संख्या - २२ गाड्या
- दुसऱ्या टप्प्यातील ७६.९ टक्के काम पूर्ण
- एकूण ९५.३ टक्के प्रकल्प बांधकाम पूर्ण
- एकूण ८८.३ टक्के स्थानक बांधकाम पूर्ण
- एकूण ४२.४ टक्के प्रणालीची कामे पूर्ण
- रेल्वे रुळाचे एकूण ४६.६ टक्के बांधकाम पूर्ण
- हा मार्ग जून २०२४ मध्ये सुरू होण्याची अपेक्षा आहे

### उपनगरीय रेल्वे स्थानकाशी अंतर्गत जोडणी

- चर्चगेट मेट्रो स्थानक - चर्चगेट पश्चिम रेल्वे स्थानक
- सीएसएमटी मेट्रो स्थानक - सीएसएमटी मध्य व हार्बर रेल्वे स्थानक
- ग्रँट रोड मेट्रो स्थानक - ग्रँट रोड पश्चिम रेल्वे स्थानक
- मुंबई सेंट्रल मेट्रो स्थानक - मुंबई सेंट्रल पश्चिम रेल्वे स्थानक आणि एसटी बस डेपो
- महालक्ष्मी मेट्रो स्थानक - महालक्ष्मी मोनोरेल स्थानक
- दादर मेट्रो स्थानक - दादर पश्चिम रेल्वे स्थानक
- बीकेसी मेट्रो स्थानक - मेट्रो मार्ग-२ बी (डी. एन. नगर - मंडाले)
- मरोळ नाका - मेट्रो मार्ग-१ (घाटकोपर ते वर्सोवा)